
# दिव्यांग सहायक पोर्टल मदतीला येणार

## बोगस दिव्यांग नोंदणीला चाप; विविध कामांसाठी शासकीय कार्यालयात चकरा मारून बेजार होण्याची चिंता मिटणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पालघर :** राज्यातील दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी योजना, सेवा तसेच तक्रारीसाठी ऑनलाइन अर्ज प्रणाली आता दिव्यांग सहायक पोर्टल आणि ॲपवर उपलब्ध झाली आहे. त्यामुळे दिव्यांगांना घरबसल्या मोबाइलवरून विविध योजनांचा शोध घेता येणार आहे. ऑनलाइन अर्ज आणि त्याची स्थिती पाहता येणार आहे. विशेष म्हणजे यामुळे बोगस दिव्यांग नोंदणीला चाप बसणार आहे. शासकीय कार्यालयात चकरा मारून बेजार होण्याची चिंता आता संपली आहे. पोर्टलच्या मदतीने एका क्लिकवर सुविधांचा लाभ घेता येणार आहे.

शासकीय योजनांसाठी ऑनलाइन अर्ज, दिव्यांग प्रमाणपत्राशी संबंधित माहिती, आर्थिक सहाय्य व अनुदान योजना, शैक्षणिक व प्रशिक्षण योजना, तक्रार निवारण सुविधा, अर्जाची ऑनलाइन पाहण्याची सुविधा यात आहे. विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी दिव्यांग शासकीय कार्यालयात गेल्यास त्यांच्यापुढे अनेक समस्या निर्माण होत असतात. पालघर जिल्ह्यात २२ हजार ६६३ दिव्यांग असून, त्यांच्या मदतीला दिव्यांग सहायक पोर्टल येणार आहे.




### कोणत्या सुविधा मिळणार?

शासकीय योजनांसाठी ऑनलाइन अर्ज, दिव्यांग प्रमाणपत्रांची संबंधित माहिती, आर्थिक सहाय्य, अनुदान योजना, शैक्षणिक व प्रशिक्षण योजना आदी सुविधा मिळणार आहेत. अर्जांची स्थिती रियल टाइममध्ये पाहता येणार आहे.


### जिल्ह्यात किती दिव्यांग?

पालघर जिल्ह्यातील आठ तालुक्यांत एकूण २२ हजार ६६३ दिव्यांगांची संख्या असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाकडून देण्यात आली. नोंदणीसाठी आधारकार्ड क्रमांक, मोबाईल क्रमांक, दिव्यांग प्रमाणपत्र, आवश्यक वैयक्तिक माहिती, नोंदणी झाल्यानंतर योजनांसाठी ऑनलाइन अर्ज करता येतो.

“ दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणकारी योजना सेवा, तसेच तक्रारींसाठी ऑनलाइन अर्ज प्रणाली आता दिव्यांग सहायक पोर्टल आणि ॲपवर उपलब्ध झाली आहे.
**डॉ. प्रकाश हसनाळकर,** समाज कल्याण अधिकारी

इस्रायल आणि अमेरिका विरुद्ध इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे वसई-विरार शहरात व्यावसायिक गॅस सिलिंडरचा तुटवडा जाणवू लागला आहे. यामुळे हॉटेल, खानावळींसह आता लग्न समारंभातील केटरिंग व्यावसायिकांनाही फटका बसत आहे. (आतील पानात)

## शब्दकोडे क्र. १७००



**आडवे शब्द :** १) लहरी, विक्षिप्त, विचित्र वागणारा, ४) एक मराठमोळा गोड पदार्थ, ७) शिकार, ९) आठवण, ११) तापमापकातील एक धातू, १२) वाद्य वाजवणारा, १४) मग्न, तल्लीन, १६) गावभर फिरणारी स्त्री या अर्थी, १७) हानी, संहार, १८) एक विदेशी दारू, १९) एक अंक, २१) नवरदेवाची आई, २२) मुंबईतील एक भाग, २४) एक गुजराती नाश्ता, २६) ज्याच्याकडे अनुमती आहे असा, २९) राम, ३१) लग्नाची मिरवणूक, ३२) श्रमामुळे ग्लानी येणे, ३३) आंब्याचा रस, ३४) भाजी, फळे यांचे शेत, ३५) शब्द देणे, ३७) शहर, ३८) चित्त, ४०) पिकांचा हंगाम, विपुलता, ४१) ऊस काढणीनंतर राहिलेला पाला पाचोळा, ४४) वर्षाव, ४५) धनुष्य बाण, ४७) पुन्हा, ४८) भारतातील एक राज्य, ४९) शर्करा, ५१) शिर्डीजवळील एक शहर, ५३) लग्न, ५५) मऊ, ५६) जोर, कळ, ५७) एक राग, ५८) एक पक्षी, ६०) मच्छर, ६१) रहस्य, गुपित, ६३) विक्रीच्या वस्तू, ६५) बायकोचे वडील, ६६) पाप, ६७) आश्चर्य, अपूर्वाई, ६८) शेतात, निसर्गरम्य ठिकाणी डबापार्टी, ६९) यापासून उपमा बनवतात.

**उभे शब्द :** १) एक शस्त्र, २) वाचन करणारा, ३) व्यायाम, ५) उपभोक्ता, ६) राघू, रावा, मिठू, ७) कर, ८) पाण्याचा मोठा साठा, तलाव, १०) मृत्यूची देवता, ११) पाळलेला, १३) शक्तिशाली, १५) एक वजनदार पक्षी, १७) अलिप्त, १९) बौद्ध धर्मीयांचे एक पवित्र स्थळ, २०) नाशिकमधील एक राम मंदिर, २३) औषध, २५) स्वामी स्वरूपानंदांचे गाव, २६) पदावरून घसरण, २७) वचक, दरारा, २८) पाठवणूक, ३०) घर वगैरे मालमत्ता, ३१) वांती, ३३) एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत, ३६) मीठ (हिं.), ३९) आरामात बसता येईल असे, ४०) निर्जन, ओसाड, ४२) पोळीचा चौथा भाग, तुकडा, ४३) धडक, ४४) मत्स्य, ४६) एक वार, ४७) संन्याशांमधील एक पदवी, ४८) पाहुण्यांची सरबराई, ५०) रावणाचा सावत्र भाऊ, ५२) प्रभाव, ५३) आकाशमार्गे प्रवासाचे साधन, ५४) वातावरण, ५९) सराईत होण्यासाठी वारंवार क्रिया, ६२) एक रास, ६४) कुशचा भाऊ, ६५) शिर्डीचे बाबा, ‘——’ बाबा, ६६) पाला, पर्ण.

**शब्दकोडे क्र. १६९९ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | नं | द | वा | र्ता | | उ | त्सा | ह | व | र्ध | क | | ला | भ |
| म | द | | य | | | मा | | ज | ळ | | ल | व | | र |
| दा | न | | व्य | स | नी | | गु | र | व | | क | र | व | त |
| र | का | ना | | म | र | ग | ळ | | ट | क | ला | | स | |
| | न | व | ल | | ज | र | | र | | स | ट | वा | ई | |
| ज | न | | ग | ती | | ज | बा | ब | दा | र | | र | | मा |
| ग | | बा | ब | | स | वं | ग | डी | | त | मा | स | गी | र |
| र | ज | | ग | ल | ब | त | | | शं | | स | दा | | वा |
| हा | व | डा | | के | | | च | ला | ख | | व | र | क | ड |
| टी | | ग | वा | र | | | व | | ना | वा | डी | | पा | |
| | सा | र | स | | | भा | चा | | द | म | | क | ल | प |
| र | थी | | ला | च | | ल | ल | ना | | न | ट | | भा | त |
| | दा | व | त | | | चं | | त | वा | | | मा | ती | |
| श | र | म | | | | द्र | व | | द | शा | न | न | | म |
| व | | न | व | का | र | | र | सा | ळ | | स | व | ल | त |

# आजचे भविष्य

विजय देशपांडे (ज्योतिषविशारद)

**शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६**
राष्ट्रीय भारतीय सौर दिनांक फाल्गुन २२, १९४७. **तिथी :** फाल्गुन कृष्ण दशमी (अहोरात्र) शालिवाहन शके १९४७. विश्वावसू नाम संवत्सर. **नक्षत्र :** दुसऱ्या दिवशी उत्तर रात्री ०३:०३ वाजेपर्यंत पूर्वाषाढा. त्यानंतर उत्तराषाढा. **रास :** धनू. **आज :** सामान्य दिवस.
**राहू काळ :** सकाळी १०:३० ते १२.
(राहू काळात महत्त्वाची कामे टाळा.)

**मेष** — **भाग्य तुमच्या बाजूने राहील.** तुमची ठरवलेली कामे पटापट होतील. महत्त्वाच्या घडामोडी घडतील. अपेक्षित पत्रव्यवहार होतील. प्रगतीसाठी अनुकूल वातावरण राहील. कामाचा ताण कमी होईल. आवडत्या छंदासाठी वेळ मिळेल.

**वृषभ** — **महत्त्वाची कामे पुढे ढकलणे ठीक राहील.** त्यामुळे तुमची दगदग कमी होईल. नोकरीत तुम्हाला जबाबदारीचे काम करावे लागेल. वरिष्ठांकडून प्रशस्तिपत्र मिळेल. वाहनाच्या वेगावर नियंत्रण ठेवा. गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळा.

**मिथुन** — **प्रगतीसाठी अनुकूल वातावरण राहील.** नोकरीत तुमचे पारडे जड राहील. सहकारी वर्गाची चांगली साथ राहील. आवडते छंद जोपासण्यासाठी वेळ देता येईल. काही तरी नवीन शिकण्याची इच्छा निर्माण होईल. जीवनसाथी तुमच्या मर्जीनुसार वागेल.

**कर्क** — **कार्यक्षेत्रात नवीन जबाबदारी अंगावर पडेल.** त्यात खूप व्यस्त राहाल. फार दगदग होईल अशी कामे करू नका. नाही तर चिडचिड होऊ शकते. आरोग्याच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. हलका पौष्टिक आहार घ्या. आराम करणेही आवश्यक आहे.

**सिंह** — **आपली नेहमीची कामे आरामात होतील.** दुपारनंतर तुम्हाला कामानिमित्त प्रवास करावा लागेल. नोकरीत आत्मविश्वास कामी येईल. मुलांच्या यशाच्या वार्ता कानावर पडतील. थोरामोठ्यांच्या ओळखीतून फायदे होतील. जुनी येणी वसूल होतील.

**कन्या** — **ग्रहमानाची अनुकूलता अनुभवायला मिळेल.** अडून राहिलेली कामे ऐरणीवर येतील. थोड्याच प्रयत्नात यश मिळेल. नोकरीत कामाचे स्वरूप बदलेल. तुमचे वर्चस्व प्रस्थापित करण्यात यश मिळेल. लोकांचे सहकार्य मिळेल. धनलक्ष्मीची तुमच्यावर कृपा राहील.

**तूळ** — **जवळच्या लोकांच्या सहवासात याल.** मुले तुमच्या अपेक्षा पूर्ण करतील. व्यवसायात भरभराट होईल. ग्राहकांचा प्रतिसाद चांगला राहील. हाती पैसा खेळता राहील. मात्र बाजारपेठेचा अंदाज चुकू शकतो. त्यामुळे सावधपणे उलाढाली करा.

**वृश्चिक** — **नोकरी व्यवसायात अनुकूल परिस्थिती राहील.** पैशाचा ओघ सुरू राहील. अपेक्षेपेक्षा जास्त प्रमाणात यश मिळेल. नोकरीत तुमच्या कामाची लोकांकडून प्रशंसा केली जाईल. मित्र-मैत्रिणींसमवेत मौजमजा करण्यासाठी वेळ द्याल.

**धनू** — **हाती घेतलेले प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण कराल.** तुमच्या कल्पना लोकांना आवडतील. लोकांचे चांगले सहकार्य मिळेल. प्रलंबित कामे आपोआप मार्गी लागतील. जीवनसाथीशी मधुर संबंध राहतील. प्रेमात अपेक्षित प्रतिसाद मिळेल.

**मकर** — **जमिनीच्या व्यवहारात फायदा होईल.** मात्र, कागदोपत्री व्यवहार करताना नियम व अटी नीट वाचून घ्या. अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवा. प्रवास शक्यतो टाळा. अनोळखी व्यक्तींना तुमची गोपनीय माहिती देऊ नका. नोकरीत अनुकूल स्थिती राहील.

**कुंभ** — **जे जे ठरवाल ते ते सिद्धीस जाईल अशी परिस्थिती राहील.** मनात प्रसन्न विचार राहतील. थोरामोठ्यांच्या ओळखीतून फायदे होतील. तुमचा नावलौकिक वाढेल. धनलक्ष्मीची तुमच्यावर कृपा राहील. अनेक उत्तम लाभ होतील. चांगल्या कामात गुंतलेले राहाल.

**मीन** — **घरात एखाद्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल.** त्या निमित्ताने घरी पाहुणे मंडळी येतील. गृह सजावटीकडे लक्ष द्याल. त्यासाठी पैसा खर्च कराल. नोकरीत पदोन्नती मिळण्याची शक्यता आहे. त्यातून आर्थिक प्राप्ती चांगली होईल.

# दिव्यांगांचा त्रास थांबणार; सरकारी कार्यालयात व्हीलचेअर मिळणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** सरकारी कार्यालयांत कामानिमित्त येणाऱ्या ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींना होणारा त्रास कमी करण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. सरकारी इमारतींमध्ये प्रवेश सुलभ व्हावा, यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने दिले आहेत.

न्यायालयाच्या आदेशानुसार सरकारी कार्यालयांमध्ये लिफ्ट, सरकते जिने, रॅम्प आणि व्हीलचेअर यांसारख्या सुविधा अनिवार्य करण्यात येणार आहेत. या सुविधा तीन महिन्यांच्या आत उपलब्ध करून देण्याचे निर्देशही प्रशासनाला दिले आहेत. कार्यालयात व्हीलचेअर उपलब्ध असल्याचा फलक लावणेही बंधनकारक केले आहे. शहरातील अनेक सरकारी कार्यालयांत अजूनही अशा सुविधांचा आले ठिकाणी लिफ्ट असली तरी ती बंद असते किंवा फक्त अधिकाऱ्यांसाठीच वापरली जाते. त्यामुळे वृद्ध, दिव्यांग नागरिकांना जिने चढताना कसरत करावी लागते.

### सरकारी कार्यालयांत वृद्ध, दिव्यांगांची कसरत

शासकीय कामासाठी सरकारी कार्यालयांत येणाऱ्या ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. अनेक कार्यालये वरच्या मजल्यांवर असल्यामुळे जिने चढणे भाग पडते. लिफ्ट किंवा रॅम्प नसल्यामुळे व्हीलचेअर वापरणाऱ्या व्यक्तींना तर अधिक त्रास सहन करावा लागतो.

### लिफ्ट, व्हीलचेअर, रॅम्प अनिवार्य

सरकारी दुमजली आणि बहुमजली कार्यालयांमध्ये लिफ्ट, रॅम्प, व्हीलचेअर सुविधांअभावी चढताना तसेच उतरताना दिव्यांग आणि वृद्ध नागरिकांना त्रास होतो.

**या सर्व सुविधा ज्या कार्यालयांमध्ये नाहीत तेथे त्या तीन महिन्यांत उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.**

संबंधित कार्यालयांमध्ये व्हीलचेअर उपलब्ध असल्याचा सूचना फलक लावावा, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. यामुळे ही सुविधा मिळणार आहे.

### सुविधांसाठी तीन महिन्यांची मुदत

सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी न्यायालयाने प्रशासनाला तीन महिन्यांची मुदत दिली आहे. या कालावधीत संबंधित विभागांनी आवश्यक पावले उचलून कार्यालये सुलभ करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ज्या कार्यालयांत व्हीलचेअर उपलब्ध आहे, तेथे त्याची माहिती नागरिकांना सहज दिसावी यासाठी कार्यालयाच्या ठिकाणी व्हीलचेअर उपलब्धतेचा फलक लावण्याचेही निर्देश कोर्टाने दिले.



### काही शासकीय कार्यालयांत सुविधाच नाही

शहरातील काही सरकारी कार्यालयांत अजूनही लिफ्ट, रॅम्प किंवा व्हीलचेअरची कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्याचे दिसून येते. त्यामुळे वृद्ध आणि दिव्यांग नागरिकांना कार्यालयीन कामांसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. मनपाच्या काही विभागीय कार्यालयात अजूनही या सुविधा नसल्याचे चित्र आहे.

### काही कार्यालयांतील लिफ्ट बंद

काही कार्यालयांत लिफ्टची सुविधा असली तरी ती अनेकदा बंद ठेवली जाते किंवा केवळ अधिकाऱ्यांसाठी वापरली जाते. त्यामुळे नागरिकांना जिन्याचा वापर करावा लागतो आणि यामुळे ज्येष्ठ नागरिकांना अधिक त्रास सहन करावा लागतो.

### जेथे शक्य नसेल तेथे काय होणार?

ज्या जुन्या इमारतींमध्ये लिफ्ट बसविणे शक्य नसेल, अशा ठिकाणी पर्यायी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत प्रशासनाने उपाययोजना करणे अपेक्षित आहे. रॅम्प, पोर्टेबल व्हीलचेअर किंवा तळमजल्यावर सेवा उपलब्ध करून देणे अशा उपायांचा विचार केला जाऊ शकतो.

# वसई-विरार जनशक्ती आघाडीचे ‘धरणे’

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** ‘वसई विरार जनशक्ती आघाडी’मार्फत वसईतील स्थानिक भूमिपुत्र व नागरिकांच्या जिव्हाळ्याच्या समस्यांवर गुरुवारी धरणे आंदोलन करण्यात आले. वसई तहसीलदार कार्यालयासमोर झालेल्या आंदोलनादरम्यान मॅकेन्झी डाबरे, मिलिंद खानोलकर, कुमार राऊत, अनिल चव्हाण, डॉमनिका डाबरे, सुमित डोंगरे, गीता जाधव आदी उपस्थित होते.

भूमिपुत्रांची घरे नियमानुकूल करण्यात यावी, वाढीव एफएसआय रद्द करावा, बेकायदा घरपट्टी शास्ती रद्द करावी, शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, कार्यक्षम परिवहन सेवा द्यावी, डम्पिंग ग्राउंडच्या कचऱ्यावर प्रक्रिया करावी तसेच त्यात होणाऱ्या भ्रष्टाचार थांबवावा, निरी व आयआयटीच्या अहवालाची तत्काळ अंमलबजावणी करावी आदी मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

# महामार्ग सर्वेक्षणाला शेतकऱ्यांचा विरोध


लोकमत न्यूज नेटवर्क

**विक्रमगड :** विक्रमगड तालुक्यातील प्रस्तावित पालघर-मनोर-विक्रमगड-जव्हार-त्र्यंबकेश्वर राष्ट्रीय महामार्गासाठी (एनएच १६०ए) काही अधिकाऱ्यांनी पुन्हा रस्त्याचे सर्वेक्षण करण्याचा प्रयत्न केला. मात्र, सवादे येथे स्थानिक बाधित शेतकरी व नागरिकांनी तीव्र विरोध करत सर्वेक्षण थांबवले. या घटनेची माहिती मिळताच भूमिपुत्र एकजूट संघर्ष समितीचे संयोजक विश्वनाथ पाटील (कुणबी सेनाप्रमुख) व समितीचे इतर सदस्य तत्काळ घटनास्थळी पोहोचले. त्यांच्या हस्तक्षेपानंतर संबंधित अधिकाऱ्यांना सर्वेक्षण थांबवावे लागले.

सर्वेक्षण थांबविल्यानंतर तहसीलदार यांच्या दालनात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी व भूमिपुत्र एकजूट संघर्ष समितीचे प्रतिनिधी यांच्यात तातडीची बैठक पार पडली. बैठकीत संघर्ष समितीच्या वतीने स्पष्ट भूमिका मांडण्यात आली. जोपर्यंत जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातील प्रमुख मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत परिसरात कोणतेही सर्वेक्षण किंवा महामार्गाचे काम सुरू करू नये, अशी भूमिका बाधित नागरिकांनी घेतली. दरम्यान, तहसीलदार यांनीही सकारात्मक भूमिका घेत बाधित शेतकरी व प्रशासन यांच्यात लवकरात लवकर संयुक्त बैठक आयोजित करण्यात यावी, असे तोंडी निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले असून, त्यानंतरच निर्णय घेण्यात येईल, असे सांगितले.











लोकमत CLASSIFIEDS classified online — क्लिक करा बुक करा http://online.lokmatclassified.com

**नोकरीविषयक**

**पार्ट टाईम जॉब**

Profitable Part time job in Leading Reputed Corporate for Seniors, Retired, VRS, H'wives, Bankers. M/F, Age: 45+. Passive Income + Benefits.: 9920040565 (711138)

**पाहिजेत**

**आवश्यक लेखापाल.** एका नामांकित कंपनीला टॅली आणि जीएसटी फाइलिंगचे ज्ञान असलेल्या अकाऊंटंटची आवश्यकता आहे. फ्रेशर्स किंवा अनुभवी उमेदवार अर्ज करू शकतात. वय 20-45 वर्षे. namanhrteam@gmail.com वर आपला सीव्ही मेल करा. तसेच पॅन्ट्री हाताळण्याची क्षमता असलेला ऑफिस बॉय आवश्यक आहे. 022-49604230 शी संपर्कसाधा. (712528)

**विवाहविषयक**

**वर पाहिजे**

**अनाथ मुलीला सुयोग्य वर** पाहिजे, मुलीचे वय: 26 वर्ष, शिक्षण: 12 वी, मुलगी सध्या अनाथ आश्रममध्ये आहे. (जातीची व वयाची अट नाही) संपर्क: 9764297252 (712368)

**त्वरित विवाह मुलगी गरीब** कुटुंबातील दिसायला छान आहे. वधू वय-25, शिक्षण-12वी पास मुलगी सराफ दुकानात कामाला आहे. जात-मराठा, कोणतीही अट नाही. संपर्क-9075496356 (712383)

**पर्यटन**

**सहल यात्रा**

**श्रीराम यात्रातर्फे- चारधाम** बद्रि-केदार- गंगोत्री- यमुनोत्री- द्वारका-राज., काश्मीर- वैष्णोदेवी- कुल्लूमनाली, दक्षिणभारत, खाटुश्याम. मुलुंड- 9028452864, बदलापुर- 7058513585. (695868)

लोकमत — जाहिरात छोटी किमया मोठी

लोकमत — वाचकांना विनम्र सूचना

लोकमत वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची लोकमत वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल लोकमत वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


**जाहीर सूचना**
**वेलगाव पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय: प्लॉट क्र. IN-KHNO ४१४, ४१५, ४१६, ४१७, ४१८ (MIN) तळमजला, नवी दिल्ली – ११००३८.
सीआयएन : U42202DL2025GOI445416

**वेलगाव पॉवर ट्रान्समिशन लिमिटेडच्या पारेषण परवाना मिळण्याच्या अर्जावर सूचना/हरकती मागविण्याबाबत.**

१. वेलगाव पॉवर ट्रान्समिशन लिमिटेडने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे विद्युत कायदा, २००३ च्या कलम १४ आणि १५ च्या तरतुदींनुसार आणि एमईआरसी (पारेषण परवाना अटी) नियमावली, २००४ अंतर्गत पारेषण परवाना मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. माननीय आयोगाने १२ मार्च २०२६ रोजी हा अर्ज स्वीकारला असून वेलगाव पॉवर ट्रान्समिशन लिमिटेडला विद्युत कायदा, २००३ च्या कलम १५(२) अंतर्गत जाहीर सूचना प्रसिद्ध करण्याचे निर्देश दिले आहेत.

२. वेलगाव पॉवर ट्रान्समिशन लिमिटेडची स्थापना महाराष्ट्र राज्यातील नेटवर्क विस्तारीकरण योजनेसाठ अंतर्गत-राज्य पारेषण प्रणाली उभारण्यासाठी एक विशेष उद्देश वाहन म्हणून करण्यात आली आहे. याचा मुख्य उद्देश मुंबईसाठी अतिरिक्त स्रोत केंद्र तयार करणे आणि मुंबईतील एम्बेडेड जनरेशन उपलब्ध नसल्यास ४०० / २२० केव्ही बोईसर (पीजी) आयसीटी वरील लोडिंग मर्यादांच्या समस्या सोडवणे हा आहे. या प्रकल्पामुळे मुंबई महानगर प्रदेशातील विद्युत पारेषण क्षमता वाढेल आणि पारेषण पायाभूत सुविधांची विश्वासार्हता सुधारेल. महाराष्ट्र सरकारने बिड प्रोसेस कोऑर्डिनेटर म्हणून अधिसूचित केलेल्या आरईसी पॉवर डेव्हलपमेंट अँड कन्सल्टन्सी लिमिटेडमार्फत राबवण्यात आलेल्या 'टॅरिफ आधारित स्पर्धात्मक बोली' प्रक्रियेद्वारे हा प्रकल्प देण्यात आला आहे.

३. या प्रकल्पामध्ये ३x५०० एमव्हीए, ४०० / २२० केव्ही आयसीटी वेलगाव सब-स्टेशन आणि संबंधित बे व लाईन्सचे बांधकाम, तारापूर-कुडूस II डी/सी लाईनवर वेलगाव जीआयएस येथे ४०० केव्ही लिलो, डहाणू-घोडबंदर डी/सी लाईनवर वेलगाव जीआयएस येथे २२० केव्ही लिलो, बोईसर-बोरिवली एस/सी लाईनवर वेलगाव जीआयएस येथे २२० केव्ही लिलो, डहाणू-वर्सोवा एस/सी लाईनवर वेलगाव जीआयएस येथे २२० केव्ही लिलो आणि बोईसर-वर्सोवा एस/सी लाईनवर वेलगाव जीआयएस येथे २२० केव्ही लिलो यांचा समावेश आहे. यशस्वी बोलीदाराने बोली प्रक्रियेनुसार अर्जदार कंपनीचे अधिग्रहण केले असून, महाराष्ट्र राज्यात सदर अंतर्गत-राज्य पारेषण प्रणालीची स्थापना, संचलन आणि देखभाल करण्यासाठी पारेषण परवाना मिळवणे आवश्यक आहे. त्यानुसार, वेलगाव पॉवर ट्रान्समिशन लिमिटेडने पारेषण परवाना मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

४. माननीय आयोगाने वेलगाव पॉवर ट्रान्समिशन लिमिटेडला या सूचनेद्वारे पारेषण परवाना मिळण्याच्या अर्जावर जनतेकडून सूचना/हरकती मागवण्याचे निर्देश दिले आहेत. अर्जाची प्रत तपासणीसाठी किंवा खरेदी करण्यासाठी ज्या नोडल व्यक्तीशी संपर्क साधायचा आहे, त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:
अ. **नाव:** श्री. चंदन सिंग
ब. **अर्जाची प्रत तपासणीसाठी किंवा खरेदीसाठी उपलब्ध असणारा पत्ता:** प्लॉट क्र. IN-KHNO ४१४, ४१५, ४१६, ४१७, ४१८, MIN तळमजला, नवी दिल्ली - ११००३८.
क. **तपासणी किंवा खरेदीची वेळ:** कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०:०० ते संध्याकाळी १७:०० वाजेपर्यंत.
ड. **अर्जाची सविस्तर कागदपत्रे (इंग्रजीमध्ये) सीडीसह :** १००/- रुपये रोख किंवा 'वेलगाव पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड' (Velgaon Power Transmission Limited) यांच्या नावे काढलेल्या व मुंबई येथे देय असलेल्या डीडी/चेकद्वारे शुल्क भरून मिळतील.
इ. **वेबसाईटचा पत्ता जिथून अर्जाची प्रत विनामूल्य डाऊनलोड करता येईल:** www.ceigall.com

५. प्रसिद्ध करण्यात आलेल्या या जाहीर सूचनेला प्रतिसाद म्हणून, ज्या कोणालाही आपल्या सूचना/हरकती नोंदवायच्या आहेत, ते इंग्रजी किंवा मराठी भाषेत लेखी स्वरूपात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या संकेतस्थळावरील (www.merc.gov.in/e-public-consultation) ‘E-Public Consultation’ या टॅबद्वारे अपलोड करून सादर करू शकतात. या सुविधेचा वापर करताना काही अडचण आल्यास, संबंधित भागधारक सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी १०:०० ते संध्याकाळी ०५:०० या वेळेत आयोगाच्या कार्यालयाशी मोबाईल क्र. ८९२८०७१५२२ किंवा ई-मेल आयडी: suggestions@merc.gov.in वर संपर्क साधू शकतात.

६. ज्या व्यक्तीने आपल्या सूचना आणि हरकती ‘E-Public Consultation’ टॅबवर अपलोड केल्या आहेत, त्यांना त्यांच्या सादरीकरणाची कोणतीही हार्ड कॉपी (छापील प्रत) दाखल करण्याची गरज नाही. ज्या व्यक्तींकडे इलेक्ट्रॉनिक माध्यमांची सोय उपलब्ध नाही, ते आपल्या सूचना आणि हरकतींची हार्ड कॉपी 'सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, सेंटर क्र. १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई- ४००००५' या पत्त्यावर पाठवू शकतात. यासोबतच, त्यांनी श्री. चंदन सिंग (प्लॉट क्र. IN-KHNO ४१४, ४१५, ४१६, ४१७, ४१८, MIN तळमजला, नवी दिल्ली - ११००३८, ई-मेल: velgaon@ceigall.com / t-d@ceigall.com) यांना प्रत पाठवल्याचा पुरावा जोडावा. तसेच त्यावर पाठवणाऱ्याचे पूर्ण नाव, टपाल पत्ता आणि उपलब्ध असल्यास ई-मेल पत्ता नमूद करावा. **१५ एप्रिल २०२६ रोजी संध्याकाळी ५:०० वाजेनंतर** प्राप्त झालेल्या सूचना आणि/किंवा हरकतींचा विचार केला जाणार नाही. इतर कोणत्याही माध्यमाद्वारे दाखल केलेल्या सूचना/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

७. वेलगाव पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड प्राप्त झालेल्या प्रत्येक हरकतीला/ सूचनेला ती मिळाल्यापासून तीन दिवसांच्या आत उत्तर देईल; मात्र १५ एप्रिल २०२६ पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व हरकतींना/सूचनांना १८ एप्रिल २०२६ नंतर उत्तर दिले जाणार नाही.

स्थळ: मुंबई
दिनांक: १३.०३.२०२६

**स्वाक्षरी/-**
**श्री. चंदन सिंग, संचालक**